नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २६१ | Issue - 261 | वार शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ | Blow- Friday Date 7 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्याच्या संरक्षण उत्पादन धोरणामुळे देशाचे खरे ‘डिफेन्स क्लस्टर’ हे महाराष्ट्र आणि पुण्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### निबे डिफेन्स अॅण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र हे पहिले असे राज्य आहे की ज्याने काळाची पावले ओळखून २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार केले. आज देशाचे खरे डिफेन्स क्लस्टर हे महाराष्ट्र आणि त्यातही ते पुण्यात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘मेक इन इंडिया-मेक फॉर वर्ल्ड’ ही घोषणा दिली आणि देशातील नवोन्मेषकांना संधी, व्यासपीठ मिळवून दिल्याने आज आपला देश संरक्षण क्षेत्रात श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करत आहे, असेही ते म्हणाले.

चाकण औद्योगिक क्षेत्रांतर्गत नानेकरवाडी येथील निबे डिफेन्स ण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन आणि स्थापना दिन सोहळा तसेच कंपनीच्या शिर्डी सुविधेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, आमदार महेश लांडगे, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, एल अँड टी डिफेन्सचे कार्यकारी उपाध्यक्ष अरुण राम चंदाणी उपस्थित होते.




आपल्या देशात नवोन्मेषकांची कधीच कमतरता नव्हती, मात्र त्यांना संधी, व्यासपीठ मिळत नव्हते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यांनी ‘मेक इन इंडिया-मेक फॉर वर्ल्ड ही घोषणा केली. संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या बळावळ श्रेष्ठत्व असलेल्या अमेरिकेसह जगातील श्रीमंत देशांच्या श्रीमंतीच्या पाठीशी त्यांचे संरक्षण उत्पादन आहे. संरक्षण उत्पादनांच्या बाबतीत आपला देश दुर्दैवाने मागे राहिला. आपण अनेक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्या सुरू केल्या. त्यांनी निश्चितच चांगले काम केले. मात्र, यामध्ये जी अत्याधुनिकतेकडे, तंत्रज्ञानाधारित युद्धपद्धतीकडे (टेक्नॉलॉजिकल वॉरफेअर) वाटचाल होणे आवश्यक होते, ते झाले नाही. ते काम मोदी यांच्या काळात झाले. आगामी काळ हा टेक्नॉलॉजिकल वॉरफेअरचा असून या मध्ये भारताला श्रेष्ठत्व मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री मोदी यांनी, ज्या देशांकडून संरक्षण उत्पादने आयात करण्यात येतील त्यातील काही भाग त्यांनी भारतातच तयार करावेत अशी अट ठेवली. या अटीमुळे आयात होणाऱ्या संरक्षण उत्पादनांचे काही भाग आपल्या देशातच तयार व्हायला सुरुवात झाली. २०१६ साली माझगाव डॉक येथे एका पाणबुडीचे जलावतरण झाले होते ती १०० टक्के आयातीत भागांवर होती. मात्र नुकतेच प्रधानमंत्री यांच्या हस्ते जलावतरण झालेल्या पाणबुडीचे ६० टक्क्याहून अधिक भाग हे भारतात तयार करू शकलो आहोत. यापूर्वी या पाणबुडीसाठी चार पट अधिक खर्च करत होतो. (पान २ वर...)

## आणीबाणीचे ते दिवस देश कधीही विसरु शकत नाही : पंतप्रधान मोदी

### अनेक मुद्द्यांवर काँग्रेसला करुन दिली संविधानाची आठवण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सत्तेच्या सुखासाठी आणि शाही कुटुंबाच्या अहंकारासाठी लाखो कुटुंबं त्या काळात देशोधडीला लागली. आपल्या देशाला तुरुंग करण्यात आलं होतं. अत्यंत मोठा संघर्ष झाला, स्वतःला तीस मार खाँ समजणाऱ्यांना नंतर गुडघे टेकावे लागले. भारताच्या नसांनसांत लोकशाही भिनलेली आहे त्यामुळेच असं घडलं असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राज्यसभेत भाषण केलं. आपल्या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा काँग्रेसवर जोरदार टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणीबाणीचा मुद्दा उपस्थित केला आणि काँग्रेसने कायमच कलाकार, नेते यांच्यावर कसा अन्याय केला ते उदाहरणांसह सांगितलं. तसंच जे लोक संविधान खिशात घेऊन फिरतात त्यांना वाटतं की त्याचं महत्त्व कसं सममजेल असा टोलाही नरेंद्र मोदींनी लगावला.

पंडित नेहरु पंतप्रधान होते त्यावेळी मुंबईत मजुरांचा एक संप होता. त्यावेळी मजरुह सुल्तानपुरी यांनी एक कविता म्हटली होती. नेहरु कॉमनवेल्थ का दास है. ही कविता म्हटली हा गुन्हा घडल्याने त्यांना तुरुंगात टाकण्यात आलं.

बलराज सहानी एका मोर्चामध्ये सहभागी झाले होते त्यांना तुरुंगात धाडण्यात आलं. लता मंगेशकर यांच्या भावाने म्हणजे हृदयनाथ मंगेशकर यांनी वीर सावरकर यांच्या एका कवितेला चाल लावली आणि ते गाणं आकाशवाणीवर प्रसारित करण्याचं ठरवलं. त्यांची आकाशवाणीमधून हकालपट्टी करण्यात आली. हृदयनाथ मंगेशकर यांनीही हा प्रसंग एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितला होता. देशाने असाही काळ पाहिला आहे की देवानंद यांनी आणीबाणीला पाठिंबा दिला नाही म्हणून दूरदर्शनवर त्यांच्या चित्रपटांना बंदी घालण्यात आली.

किशोर कुमार यांनी काँग्रेससाठी गाणं म्हटलं नाही म्हणून त्यांना आकाशवाणीचे दरवाजे बंद झाले होते.

हे पाच आरोप करत काँग्रेसवर मोदींनी जोरदार टीका केली. या टीकेनंतर काँग्रेसने गदारोळ सुरु केला होता. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचं भाषण केलं. मोदी पुढे म्हणाले, आणीबाणीचे ते दिवस देश कधीही विसरु शकत नाही. जे लोकशाहीच्या गोष्टी करतात त्यांनी आणीबाणीच्या काळात जॉर्ज फर्नांडीससह अनेक महान नेत्यांच्या हातात बेड्या घातल्या गेल्या होत्या.

देशाचे प्रसिद्ध नेते, त्यांना बेड्या घालण्यात आल्या साखळदंडाने बांधण्यात आलं होतं. आज ते लोक संविधानाबाबत बोलत असतील तर त्यांच्या तोंडी तो शब्द शोभत नाही.

### वारकरी, भाविकांना चंद्रभागा नदीत करता येणार पवित्र स्नान

## माघी यात्रेसाठी चंद्रभागा नदीपात्रात सोडले पाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माघ शुध्द एकादशी ८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून माघ यात्रा कालावधी ०२ ते १२ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते.श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. भाविकांना चंद्रभागाभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पूला जवळील बंधाऱ्यातून २४० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे.



चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याने व जास्त काळ पाणी साठून राहिल्याने पाण्यावर शेवाळे येऊन पाणी जास्त काळ साठल्याने पाणी घाण झाले होते . उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी तातडीने कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग व पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करून गुरसाळे व नगर परिषदेच्या बंधारे मधून तातडीने सहा दरवाजे उघडून नदी पत्रामध्ये पाणी सोडण्याबाबत सूचना दिल्या . त्या अनुषंगाने गुरसाळे बंधाऱ्यातून व नगर परिषदेच्या बंधार्यामधून भाविकांचे सोयीसाठी बंधाऱ्याचे सहा दरवाजे उघडून चंद्रभागा नदीपात्रामध्ये पाणी सोडण्यात आल्याने व माघी यात्रेमध्ये भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध झाल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे

तसेच नदीपात्रामध्ये सध्या पाण्याची रिसायकलिंग करून पाणी स्वच्छ करण्याची यंत्रणा बसवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून, सदरची यंत्रणा आषाढी यात्रेपूर्वी कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाने दिली आहे.







दैनिक

# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### माघी यात्रा

माघी शुद्ध एकादशी ०८ फेब्रुवारी रोजी होणार असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात. यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असून मंदिर समितीनेही भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांकडे बारकाईने लक्ष देऊन आहेत. या यात्रेत येणाऱ्या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यासाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती करण्यात आली आहे. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते.श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. भाविकांना चंद्रभागाभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पूला जवळील बंधाऱ्यातून २४० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे.

## राज्याच्या संरक्षण उत्पादन धोरणामुळे देशाचे खरे ‘डिफेन्स क्लस्टर’ हे महाराष्ट्र आणि पुण्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) यामुळे एक मोठी परिसंस्था (इकोसिस्टीम) आपल्या देशात तयार झाली आहे. यापूर्वी संपूर्ण संरक्षण उत्पादनांचे आयात करणारा आपला देश आज २५ हजार कोटी रुपयांची निर्यात करत आहे. आज मोठे काम या क्षेत्रात देशात होत आहे. महाराष्ट्राने २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार करुन त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी अंतर्गत निधी (फंड ऑफ फंड) स्थापन केला. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील ३०० स्टार्टअप सुरू झाले. आज पुणे नागपूर आदी ठिकाणी संरक्षण उत्पादन होत आहे.

आपला देश यापूर्वी संरक्षण साधनांसाठी याचक होता; मात्र आज श्रेष्ठ असून अचूक पद्धतीने विविध संरक्षण उत्पादने तयार करीत आहे. शत्रूदेशावर अचूक मारा करण्याच्या दृष्टीने आज मार्गदर्शित क्षेपणास्त्राचा (गायडेड मिसाइल) जवळपास दोन हजार किलोमीटरची पल्ला गाठण्याकडे आपला प्रवास सुरू असून संरक्षण क्षेत्रात जगातील प्रगत देशांमध्ये आपला समावेश होत आहे. संरक्षण क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीचे श्रेय नीबेसारख्या लोकांना जाते, त्यांनी संशोधन केले, एल अँड टी सारख्या कंपनीने त्यांच्यावर विश्वास दाखविला, असेही ते म्हणाले.

# लघुलेखक : कलात्मकतेची किमया !

सर आयझॅक पिटमन यांना आधुनिक स्टेनोग्राफीचे जनक मानले जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त ‘स्टेनोग्राफर दिन’ साजरा केला जातो. स्टेनोग्राफी ज्याला इंग्रजीमध्ये शॉर्टहँड म्हणून ओळखले जाते, तेच स्टेनोग्राफरचे कार्य आहे. स्टेनोग्राफर हे सरकारी विभाग आणि मंत्रालयामध्ये सामान्य आणि प्रशासकीय कर्तव्ये पार पाडतात. न्यायालये, संस्था, महाविद्यालये किंवा फार कमी वेळात, वक्ता जे भाषण देतो ते रेकॉर्ड करण्यासाठी स्टेनोग्राफर, टंकलेखन यंत्र किंवा संगणक वापरले जाते. तसेच प्रत्येक परिस्थितीत जेव्हा एखाद्याचे भाषण लिहिणे किंवा रेकॉर्ड करणे आवश्यक असते तेव्हा स्टेनोग्राफरची गरज भासते. स्टेनोग्राफरची गरज दिवसेंदिवस वाढत आहे, त्यांच्याकडे विशेष टायपिंग कौशल्य असते. ते अद्वितीय चिन्हांच्या सहाय्याने बोललेले उच्चार संक्षिप्त स्वरूपात रेकॉर्ड करतात. सरकारी पदांसाठी स्टेनोग्राफर निवडण्यासाठी कर्मचारी निवड आयोगचा वापर केला जातो. त्यांच्याकडे न्यायालये, सरकारी इमारती इत्यादींमध्ये सर्वाधिक रोजगाराचे पर्याय आहेत.

स्टेनोग्राफर कसे बनायचे? हे शिकण्यापूर्वी एक उदाहरण म्हणजे स्टेनोग्राफर ज्यांच्याकडे अद्वितीय प्रकारचे ज्ञान आहे. ज्याचा वापर ते फक्त काही शब्द आणि विशिष्ट कोड वापरून जटिल भाषा किंवा लांबलचक विधाने तयार करण्यासाठी करतात. त्याचे दुसरे नाव लघुलेख आहे, त्यांच्या अविश्वसनीय कोडिंग कौशल्यांचा आणि टंकलेखन यंत्र किंवा संगणक वापर करून, लघुलेखक कमी शब्दात लांबलचक भाषण लिहू शकतात. मान्यताप्राप्त विद्यापीठातून बॅचलर पदवी मिळविण्यासाठी प्रथम उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यानंतर कोणताही कोर्स करून पदवी प्राप्त करू शकतात. कर्मचारी निवड आयोगच्या स्टेनो परीक्षेसाठी तयार होण्यासाठी पदवी पूर्ण करताना टायपिंगचा वेग आणि अचूकता सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. स्टेनो परीक्षा उत्तीर्ण होण्याबद्दल अधिक जाणून घ्यायचे असल्यास कोणत्याही कर्मचारी निवड आयोगच्या कोचिंग सेंटरमध्ये जावे. कोचिंग ही नक्कीच चांगली कल्पना आहे, कोचिंगमध्ये समाविष्ट असलेल्या विषयांची नोंद घेणे परीक्षेदरम्यान खूप उपयुक्त ठरतील, कोणतीही सामग्री चुकणार नाही याची खात्री करण्यासाठी दररोज वर्गात जाऊन पूर्ण तयारी करावे.

शैक्षणिक आवश्यकता ही कोणत्याही अभ्यासक्रमाची सर्वात महत्त्वाची बाब आहे. जर आपण स्टेनोच्या आवश्यकतेबद्दल बोलत आहोत, तर किमान आवश्यकता म्हणजे बारावी पास; पदवी आवश्यक आहे, पदवी प्राप्त केल्यास विद्यार्थ्याला विशिष्ट भूमिकांसाठी अधूनमधून फायदे मिळतात. स्टेनोग्राफर बनण्यास इच्छुक असलेल्यांना अनेक कोर्सेस ऑफर केले जातात आणि जे पूर्ण करतात त्यांच्याकडे इतर अर्जदारांपेक्षा जास्त नोकरीची शक्यता असते. आज अनेक पॉलिटेक्निक कॉलेजद्वारे व्यवस्थापित औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संगणक विज्ञान/माहिती तंत्रज्ञान) मधील संबंधित अभ्यासक्रम किंवा भारतीय तांत्रिक संस्थेतील अभ्यासक्रम अनेक एक वर्षाचे अभ्यासक्रम ज्यात स्टेनोग्राफी, टायपिंग इ. कार्यक्रमांचा समावेश आहे.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

उमेदवारांनी लेखी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये सामान्य ज्ञान, सामान्य इंग्रजी, हिंदी, सामान्य गणित आणि तर्क समस्या समाविष्ट आहेत. प्रवेशयोग्य असलेल्या अनेक ऑनलाइन सराव परीक्षांपैकी एक घेऊन उमेदवार या प्रश्नांच्या तयारीसाठी तयार होऊ शकतात. उमेदवारांच्या श्रुतलेखन, प्रतिलेखन आणि टायपिंग कौशल्यांचे मूल्यमापन कौशल्य परीक्षेचा भाग म्हणून केले जाते. स्टेनोग्राफर ग्रेड ‘सी’ आणि स्टेनोग्राफर ग्रेड ‘डी’ पदांसाठी अर्जदारांनी इंग्रजी किंवा हिंदी मध्ये प्रति मिनिट १०० शब्द टाइप करणे आवश्यक आहे.

पुष्कळ विद्यार्थ्यांना प्रश्न पडतो की स्टेनोग्राफर किती वेगवेगळ्या प्रकारचे आहेत, म्हणून स्पष्ट करतो की, ते सर्व एकाच प्रकारचे असले तरी त्यांच्या भाषा बदलू शकतात. दोन भिन्न प्रकारचे स्टेनोग्राफर समजून घेण्यास सक्षम होण्यासाठी, दोन्ही भाषांसाठी लघुलेखन नियुक्त करणे आवश्यक आहे. स्टेनोग्राफर किंवा शॉर्टहँड टायपिस्टची टायपिंगची गती खूप वेगवान असली पाहिजे कारण त्यांना विशेषतः या नोकऱ्यांसाठी नियुक्त केले जाते. किमान ८० शब्द प्रति मिनिट त्यापेक्षा जास्त किंवा ८० शब्द प्रति मिनिट असणे आवश्यक आहे.

स्टेनोग्राफर म्हणून काम करायचे असल्यास, स्टाफ सिलेक्शन कमिशन किंवा एसएससी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. या परीक्षेत चांगली कामगिरी करण्यासाठी, पुरेशी तयारी केली पाहिजे. उमेदवाराला माहिती आहेच की, परीक्षेचे स्वरूप आणि त्यात यशस्वी व्हायचे असेल तर त्यातील प्रश्नांचा समावेश असलेल्या विषयांची माहिती असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्टेनोग्राफर परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न जाणून घेण्यासाठी व स्वत:च्या फायद्यासाठी इंटरनेट वापरू शकता. यासह स्टेनोग्राफरच्या पदासाठी तयार होण्यासाठी आधीच्या परीक्षांचे पुनरावलोकन केले पाहिजे कारण, सामान्यतः, पूर्वीच्या परीक्षांमधील प्रश्न इतर पदांसाठी देखील विचारले जातात. त्यामुळे आधीच्या परीक्षांचे काळजीपूर्वक पुनरावलोकन करावे.

स्टेनोग्राफर होण्यासाठी तुम्ही आधी वेळापत्रक बनवावे कारण असे केल्याने तुम्हाला कोणत्या दिवशी कोणत्या विषयांचा अभ्यास करायचा आहे हे कळू शकेल. हे तुम्हाला स्टेनोग्राफर परीक्षेच्या प्रश्नांशी संबंधित सर्व विषयांची पुरेशी तयारी करण्यास सक्षम करेल. याव्यतिरिक्त स्टेनोग्राफर होण्यासाठी तुम्ही तुमच्या घराजवळील कोणत्याही प्रतिष्ठित कोचिंग सुविधेची मदत घेऊ शकता. तुमच्या घराजवळ प्रतिष्ठित कोचिंग सुविधा नसेल, तरीही तुम्ही यु-ट्युब वापरून ऑनलाइन अभ्यास करू शकता कारण आजचे तंत्रज्ञान खूप प्रगत आहे. आजकाल अशी असंख्य यु-ट्युब चॅनेल आहेत जिथे केवळ स्टेनोग्राफरच नाही तर इतर परीक्षांची तयारी देखील केली जाते.

जर तुम्ही लहान हाताचा सराव करून स्टेनोग्राफी शिकत असाल तर तुम्हाला पटकन टाइप करता आले पाहिजे. त्यामुळे तुमच्याकडे रोजगाराचे अनेक पर्याय आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकार दरवर्षी अनेकदा स्टेनोग्राफरसाठी पदे उघडतात. व्यावहारिकदृष्ट्या प्रत्येक विभागात स्टेनोग्राफरची आवश्यकता असते. एसएससी स्टेनोग्राफर चाचणीचे व्यवस्थापन करते. उमेदवार ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास सरकारसाठी स्टेनोग्राफर म्हणून काम करू शकतो. आवडीनुसार बँकिंग, म्युनिसिपल गव्हर्नमेंट, रेल्वेमार्ग आणि संरक्षण क्षेत्रात स्टेनोग्राफर म्हणून काम करू शकतो. याव्यतिरिक्त कोर्टरूम, मोठ्या खाजगी कंपनी इत्यादींमध्ये स्टेनोग्राफर म्हणून काम करता येते. तरीही मोठ्या खाजगी संस्थांना पदवीनंतर स्टेनोग्राफी अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. परिणामी बारावी ग्रेड डिप्लोमा प्राप्त केल्यानंतर उमेदवार सरकारी नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकतो.

स्टेनोग्राफी अशी एक जादुई कला,
जी एका सामान्य व्यक्तीला स्टेनोग्राफर बनवते...
मजाल कुणाची की त्याने लिहिलेलं दुसरं कुणी वाचून दाखवेल.
कधी कधी तर स्वतःच तो बुचकळ्यात पडतो की,
their लिहिलंय की there....
आडव्या उभ्या, लाईट-डार्क रेषांशी खेळतांना
त्याची उडणारी तारांबळ बघण्यासारखी असते..
रेषेच्या वर, खाली आणि मध्ये लिहिल्यावर बदलणारा शब्द आणि
त्याचा अर्थ नेहमीच त्याच्याशी लपंडाव खेळत असतो....
त्यातही तो इंग्लिश आणि मराठी दोन्ही शिकत असेल, तर काही विचारायलाच नको....
पण जिद्द आणि सततचा सराव, त्याला परफेक्ट बनवतो....
लघुलेखकाचा रुबाबही काही न्याराचं असतो,
कारण त्याच्यासारखा केवळ तोच असतो...
म्हणूनच इतरही सहकारी विशेषतः
लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या ईर्षेचं तो कारण ठरतो.

## पंढरपूर तालुका लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी परिचारक गटाच्या रूपाली कारंडे यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या जवळीलच असणाऱ्या लक्ष्मी टाकळी ग्राम पंचायतचे विद्यमान उपसरपंच सागर सोनवणे यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदी आज दिनांक ०५/०२/२०२५ रोजी उपसरपंच पदाची निवडणूक ग्रामपंचायतच्या सभागृहात आज रोजी घेण्यात आली.




उपसरपंच पदी रूपाली सागर कारंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. रूपाली सागर कारंडे यांनी उपसरपंच पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला होता तर विरोधी गटाचे सहा सदस्य निवडीच्या वेळी बैठकीला गैरहजर होते.

सत्ताधारी परिचारक व साठे गटाची ११ सदस्य बैठकीस हजर होते. उपसरपंच पदासाठी ग्राम पंचायत सदस्य रूपाली कारंडे यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी जयंत खंडागळे यांनी जाहीर केले. त्यावेळी उपसरपंच पदासाठी विरोधी गटाकडून कोणताही अर्ज आला नसल्याने नूतन उत्पत्ती निवड झाल्याबद्दल रूपाली कारंडे यांचा सत्कार ग्राम पंचायत सदस्य नगरभाई साठी यांच्या शुभहस्ते करण्यात आला उपसरपंच निवडीच्या सभेच्या वेळी सध्याची अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत आदर्श सरपंच संजय साठे होते.

यावेळी ग्रामपंचायतच्या उपसरपंच रुपाली कारंडे म्हणाले की सत्ताधारी परिचारक व साठे गटाच्या मार्गदर्शनाखाली माझी उपसरपंचपदी निवड केली त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करून मला दिलेल्या पदाच्या जबाबदारीने उपयोग करून मी गावातील सर्वसामान्य गोर-गरीब जनतेचे अहोरात्री कामे करण्यासाठी उपयोग करणार असले की यावेळी त्यांनी सांगितले.

टाकळी ग्रामपंचायत नूतन सरपंच पदी रूपाली कारंडे यांची निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्याचे नेते व विद्यमान परिषदेचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक, हो शिंदे शिवसेनेचे संपर्क प्रमुख महेश (नाना) साठे, अभिमन्यू पवार, सरपंच पती सागर कारंडे, दाजी चंदनशिवे, ग्राम पंचायत सदस्य नागरबाई साठे आशाबाई देवकते, विजय मला वाळके, रेश्मा साठे, रोहिणी साठे, औदुंबर ढोणे नंदकुमार वाघमारे महादेव पवार सुरेश टिकुरे अनिल सोनवणे सुदर्शन थोपटे सचिन वाळके मारुती उकांडे अंकुश ढोणे विकास देवकते प्रथम कुलकर्णी विजय उ करंडे, औदुंबर पोतदार, शंकर धोत्रे, इत्यादी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

### सूर्यवंशी, वाकोडे, देशमुख यांना न्यायासाठी सहभागी होण्याचे आवाहन

## निफाड येथून लाँग मार्च नाशिककडे रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी ,लोकनेते विजय वाकोडे, व मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी परभणी ते मुंबई मंत्रालय लाँग मार्च १७ जानेवारी २०२५ पासून परभणी येथून सुरुवात झाली असून तो लाँग मार्च दि. पाच रोजी निफाड येथील शिवनेरी लॉन्स येथे मुक्कामी होते, यावेळी निफाड शहर व परिसरातीलआंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने त्यांची भोजनाची व सकाळी चहा नाष्टाची व्यवस्था करण्यात आली होती दि. सहा रोजी सकाळी निफाड शहरातील छ. शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास यावेळी लॉन्ग मार्चच्या वतीने पुष्पहार अर्पण करून ते नाशिककडे रवाना




झाले

याप्रसंगी शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी, लोकनेते विजय वाकोडे व मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही चैत्यभूमीवर एक भावनिक पत्र अर्पण करून न्यायासाठी दाद मागणार आहोत, येथेही आम्हाला न्यायापासून वंचित ठेवले तर हा लाँग मार्च मुंबई कडून थेट दिल्लीकडे रवाना होईल, न्याय मिळेपर्यंत आम्ही दिल्लीत ठाण मांडून बसून असा इशाराही यावेळी वाकोडे यांनी दिला

याप्रसंगी लॉन्ग मार्च चे नेतृत्व आशिष वाकोडे हे करीत असून मार्गदर्शन सिद्धार्थ भराडे, रवींद्र सोनकांबळे ,सुधीर साळवे, विश्वजीत वाघमारे, संदीप वाव्हळ, अर्जुन पंडित ,अमरदीप सोनकांबळे, रोहित जाधव आदी करत आहेत

यावेळी निफाड शहर व परिसरातील आंबेडकरी सामाज बंधु भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

### सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज यांनी केली सोई सुविधांची पाहणी

### चहा वाटपासाठी कागदी कपा ऐवजी स्टील कपाचा वापर

## माघ यात्रा : दर्शनरांगेतील गर्दी विचारात घेऊन, जादा पत्राशेडची निर्मिती : व्यवस्थापक मनोज श्रोत्री



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.०६) :- माघ एकादशीचा मुख्य सोहळा दि. ०८ फेब्रुवारी रोजी असून, वारकरी भाविकांनी मंदिर परिसरात व दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. भाविकांसाठी पदस्पर्शदर्शनरांगेत ६ पत्राशेड उभारण्यात आले होते. मात्र, दर्शनरांगेतील भाविकांची गर्दी वाढली असल्याने येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यासाठी २ अतिरिक्त पत्राशेड नव्याने उभारण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

आज मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दर्शनरांग व पत्राशेडच्या पाहणी करून आढावा घेतला. त्यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख बलभिम पावले, भिमाशंकर सारवाडकर, राजाराम ढगे, शंकर मदने व राजेंद्र घागरे उपस्थित होते.

पदस्पर्शदर्शनरांगेतील वाढती गर्दी विचारात घेऊन, २ जादा म्हणजे ८ पत्राशेड उभारणे, चहा वाटपासाठी कागदी कपा ऐवजी स्टील कपाचा वापर, मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे उड्डाणपूल उभारणे तसेच जलद व सुलभ दर्शनरांग चालविणेकामी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना यावेळी सह अध्यक्ष यांनी दिल्या. पत्राशेड येथे चांगली स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, आपत्कालिन व्यवस्थापन, दर्शनरांगेत मॅटींग, सार्वजनिक सुचना प्रणाली, स्पिकरवर अभंग आणि भक्तीगीते तसेच आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तसेच दर्शनरांगेतील एकही भाविक उपाशी राहू नये म्हणून खिचडी वाटप व दशमी, एकादशी व द्वादशीला पत्राशेड येथे अन्नछत्र सुरू राहणार आहे. सह अध्यक्ष यांनी नियुक्त प्रशासकीय अधिकारी व दर्शनरांगेतील भाविकांशी चर्चा करून, सोई सुविधांचा आढावा घेतला व दर्शन रांगेतील भाविकांना पुरेशा प्रमाणात अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे सांगीतले.

पंढरीत दाखल झालेल्या भाविकांनी सध्या विठुरायाच्या दर्शनरांगेत मोठी गर्दी केली आहे. दर्शन रांगेत हजारो भाविक उभे आहेत, या वारकरी भाविकांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्यास मंदिर प्रशासन सज्ज असून, माघ शुद्ध जया एकादशी दिवशी मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची नित्य पूजा अनुक्रमे मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. प्रकाश जवंजाळ व संभाजी शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न होत असल्याचे यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# माघी यात्रेसाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती

## अन्न व औषध प्रशासनाच्या नियम व अटीचे पालन करून प्रसादाचे उत्पादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ यात्रा दिनांक ८ फ ेब्रुवारी रोजी संपन्न होत असून, या यात्रेत येणाऱ्या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यासाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघी,चैत्री, आषाढी व कार्तिकी अशा चार मुख्य यात्रा पंढरपूर येथे साजरा करण्यात येतात. यामध्ये माघी यात्रा सुरू असून भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रम ाणात बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येत आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणारा प्रत्येक भाविक दर्शन झाल्यानंतर श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद खरेदी करत असतो. मंदिर समितीच्या बुंदी लाडू प्रसादाला भाविकांतून मोठी मागणी होत आहे. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना लाडू प्रसाद मिळावा यासाठी ५ लाख बुंदी लाडू प्रसाद व ५० हजार राजगिरा लाडू प्रसादाची उप-लब्धता ठेवण्यात येत आहे. यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत व राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे. ७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू कागदी पिशवीत पॅकिंग करून प्रति पाकीट २० रुपये प्रमाणे व २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू पॅकिंग करून प्रति पाकीट १० रुपये प्रमाणे भाविकांना उप-लब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी पश्चिम द्वार, उत्तर द्वार, श्री संत तुकाराम भवन असे एकूण तीन स्टॉल असून, सर्व स्टॉल स.६.०० ते रा. १२.०० पर्यंत खुले ठेवण्यात येत आहेत.





**सदरचा बुंदी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी १०० क्विंटल हरभरा डाळ, १५० क्विंटल साखर, ८ हजार किलो शेंगदाणा डबल रिफाईंड तेल, १५० किलो काजू, २०० किलो बेदाणा, १० किलो विलायची, ५०० ग्रॅम केसरी रंग इत्यादी मालाची खरेदी करण्यात आली असून, प्रसाद पॅकिंग करण्यासाठी पर्यावरण पूरक कागदी पिशवीचा वापर करण्यात येत आहे. सुमारे ८० कर्मचारी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी परिश्रम घेत असल्याचे मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.**

बुंदी लाडू प्रसाद एमटीडीसी भक्तनिवास येथील लाडू उत्पादन केंद्राम ध्ये हरभरा डाळ, साखर, शेंगदाणा डबल रिफाइंड तेल, काजू, बेदाणा, विलायची इत्यादी पदार्था पासून तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियम व अटींचे पालन करून तयार करण्यात येत आहे. या लाडू प्रसादाची शासकीय प्रयोगशाळेतून खाण्यास योग्य असल्याबाबत तपासणी करून घेण्यात आली आहे. भाविकांना दिला जाणारा लाडू प्रसाद स्वादिष्ट करतांना आरोग्याच्या दृष्टीनेही सर्व नियम पाळण्यात येत आहेत. बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत यांना देण्यात आली आहे.

सह अध्यक्ष औसेकर महाराज यांनी बुंदी लाडू प्रसाद उत्पादन केंद्राची पाहणी केली असून, यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, सहाय्यक विभाग प्रमुख दत्तात्रय इंगळे उपस्थित होते.

## थोडक्यात...




### व्हिडिओ डिलीट करण्यासाठी पन्नास हजाराची मागणी

सोलापूर, (प्रतिनिधी) : कारवाई करतानाचा काढलेला व्हिडिओ डिलीट करण्यासाठी फिर्यादी पोलीस हवा-लदार सुनील धूलचंद चौधरी नेमणूक शहर वाहतूक शाखा यांना ५० हजाराची मागणी केल्याप्रकरणी आकाश इंगळे (रा. सोलापूर) याच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ५ फेब्रुवारी रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास आंबेडकर भवन येथे घडली.याप्रकरणी पोलीस हवालदार सुनील चौधरी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्याच्या फिर्यादीवरून आकाश इंगळे विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप या करीत आहेत.

# गोगांव येथे श्री कल्लेश्वर मंदीराचा कळसारोहण कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





अक्कलकोट/प्रतिनीधी : गोगांव (ता.अक्कलकोट) येथील श्री कल्लेश्वर मंदिराचे कळसारोहण कार्यक्रम दिनांक १०फेब्रुवारी रोजी आयोजन केले असुन श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु,महाकाशिपीठ यांच्या अमृतहस्ते होणार असुनश्री म.नि. प्र. राजशेखर महास्वामीजी नंदगांव, श्री म.नि.प्र.बसवलिंग म हास्वामी विरक्त मठ अक्कलकोट,श्री म.नि.प्र.प्रशांत महास्वामी विरक्त मठ हत्तीकणबस,श्री मनि.प्र.शिवलिंग म हास्वामी विरक्त मठ वागदरी, श्री.ष.ब्र. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी संस्थान म ठ नागणसुर या पूज्य महास्वामीजींच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती श्री कल्लेश्वर देवस्थान ट्रस्ट, अध्यक्ष अशोक मुलगे, खजिनदार प्रदिप जगताप आणि सचिव संजय सुरवसे यांनी दिली आहे.

सलग तीन दिवस धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले असुन

### ८, ९, १० फेब्रुवारीला विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह महाप्रसादाचे सोय

शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते ५ संत गोरोबा काका महिला भजन मंडळ, सोलापूर यांजकडून भक्तीसंगीत,सायंकाळी ५ ते ८प्रा. राजकुमार कटकधोंड (दयानंद कॉलेज, सोलापूर), किरण निळ देशमुख (पोलीस निरिक्षक) यांचा गायनाचा कार्यक्रम तर ह.भ.प. कु. वैष्णवीताई भुस-ाळे उजळंब, ता. बसवकल्याण, जि. बीदर यांचा रात्रि ८ ते १० वाजता किर्तनाचा कार्यक्रम होत आहे.

रविवार ९ फ ेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ५ ते ८ श्री कल्लेश्वरास रुद्राभिषेक,सकाळी ९:०० वाजता दांपत्य पुजन, सकाळी १०:०० वाजता आरोग्य शिबिर, संयोजक पद्मवती माता मल्टीस्टेट बँक, वागदरी यांच्या वतीने सायंकाळी ४ ते ५:३० वा. ह.भ.प.श्री काशिनाथ महाराज गुरव (हसापूर) यांचे प्रवचन, सायंकाळी ५:३० वा. लक्ष दिपोत्सव सोहळा श्री म.नि.प्र. राजशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात होणार आहे.

तदनंतर रात्री ८:३० वा. श्री हनुमान भजन मंडळ, उजनी, ता. औसा व श्री हनुमान भजन मंडळ, खैराट तसेच शिवभजन मंडळ चिंचोळी के यांचे भजन होणार आहे.संभाजी घरे महार-ाज, गोराळ ता. निलंगा यांजकडून भजन, भारुड व जागरणाचा कार्यक्रम, सोमवार १० फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ वा. श्री कल्लेश्वराचे पालखी व कळस समारंभ सुहासिनींकडून गंगास्थळ व कुंभ मिरवणूक निघणार आहे.

हरिभजन मंडळ वेदांत आश्रम शाळा, शेळगांव बार्शी यांचे भक्ती संगीत कार्यक्रम सोबत श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु महाकाशिपीठ यांचे वाजत गाजत भव्य मिरवणूक व त्यांच्या अमृतहस्ते कळसारोहण कार्यक्रम सकाळी ११:३५ मि. संपन्न होणार आहे.

अन्नदान सेवा दि. ८ ते १० फ ेब्रुवारी २०२५ पर्यंत मल्लप्पा अमृत कलशेट्टी,मधुकर चंद्रकांत सुरवसे, दत्तात्रय हणमंतराव पाटील,रमेश लक्ष्मण बिराजदार (इंजिनियर )यांच्यावतीने म हाप्रसाद वाटप होणार आहे. भाविक भक्तांनी कार्यक्रमांस उपस्थित राहून म हाप्रसादाचे लाभ घ्यावे असे आवाहन सरपंच वनिता मधुकर सुरवसे,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, यांनी केले आहे.

**आ. सचिन कल्याणशेट्टी, खा.प्रणित शिंदे,आ. विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख,माजी गृहराज्य मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडकाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले,श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष,महेश इंगळे,माजी कृषि सभापती मल्लिकार्जुन पाटील,माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, माजी जि.प. सदस्य शिवानंद पाटील, बसवराज शेळके,भाजपाचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड,स्वामीनाथ नागुरे,अविनाश मडीखांबे,आनंद तानवडे यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच सह आदीची उपस्थिती लाभणार आहे.**

# शासनाच्या साठवण तलावामध्ये बेकायदेशीर रित्या खोदकाम, शासनाचे परवानगी न घेता टॉवरचे काम चालू

## बीएमसी कंपनीचा कारनामा; इलेक्ट्रिक टावरचे फाउंडेशन केले साठवण तलावामध्ये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील मौजे बोरेगांव व डोंबरजवळगे हद्दितील गट नं. ७४ च्या बाजुला शास-नाने नव्याने बनविण्यात आलेल्या साठवण तलावाच्या जागेमध्ये विना परवाना खोदकाम करुन शासनाच्या जागेवरतील बेकायदेशीर रित्या अतिक्रमण करुन शासनाची मालमत्तेची लुट करणाऱ्या कंपनीवर त्वरीत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्या साठवण तलावाम ध्ये जनावरे, व विविध प्रकारचे पशु, प्राणी त्या ठिकाणी पाणी पिण्यासाठी येत असतात. ते टॉवर विद्युत व इलेक्ट्रिक असल्यामुळे भविष्यामध्ये तेथे जीवीतहानी होण्याची शक्यता आहे. व त्यामुळे आजुबाजूच्या शेतकऱ्यांच्या पिकांचेही नुकसान होऊ शकते. त्यामुळे त्वरीत संबधित टॉवर वर त्वरीत कारवाई करण्यात यावी अशी मागणी सूरज गायकवाड यांनी तहसीलदार अक्कलकोट यांच्याकडे केले आहे

**बीएमसी कंपनीचा कारनामा**

इलेक्ट्रिक टावरचे फाउंडेशन केले शासनाच्या साठवण तलावामध्ये त्याकरता शासनाने केल्यात कोट्यावधी खर्च अशा कंपनीवरती कारवाई करण्यात यावी या मनमानी कारभारावरती कारवाई करण्यासाठी होत आहे मागणी टावर लाईन १३२ केवी असल्यामुळे साठवण तलावामध्ये पाणी थांबल्यास होऊ शकतो करंट चा धोका त्यामुळे शेतकरी पशुप्राणी गाई म्हशी यांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपनीवरती त्वरित कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केले आहे.

# भाविकांच्या सुविधेसाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना : प्रांताधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी चार आ-पत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली. माघ वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका, पत्राशेड, , विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेचे सोलापूर शहर व सोलापूर कमिटीची पदाधिकारी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारतीय बौद्ध महासभेचे सोलापूर शहर व सोलापूर कमिटीची पद नियुक्ती सोल-ापूर जिल्हा अध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष संभाजी साळवे तसेच जिल्हा संघटक कुंडलिक चंदनशिवे मामा व सोलापूर शहर महिला अध्यक्षा म्हणून वैशाली सागर उबाळे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिल्हा विधी सल्लागार पंडित लंगर,जिल्हा कोषाध्यक्ष रविंद्र कांबळे अक्कलकोट कोषाध्यक्ष श्रीशैल शिवशरण संघटक आयुष्यमान दिलीप कदम हे उपस्थित होते.

महिला शहर कमिटीची बांधणी केली असून लवकरच संपूर्ण जिल्ह्यामध्ये भारतीय बौद्ध महासभेचे काम वाढवण्याचे काम राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांच्या आदेशान-ुसार संस्था कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत तसेच सोल-ापूर जिल्ह्यातून भारतीय बौद्ध महासभा यांच्यासोबत काम करण्यास उत्सुक असणाऱ्या अनुयायांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहनही जिल्हाध्यक्ष कमलाकर कांबळे यांनी केले . तसेच आपल्या संस्थेचे १० उद्दिष्टे व डॉक्टर बाबासाहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटिव बँक के चे शेअर्स यांच्या बद्दल सविस्तर माहिती सर्वांना समजावून सांगितले कार्यक्रमासाठी इतर पदाधिकारी उपस्थित होते जयकार ठोंबरे, मारुती कांबळे, चंद्रकांत बनस-ोडे, कस्तुरा कांबळे, मंगल शिवशरण, आशा शेंडगे,उषा गाडे ,सुनंदा कांबळे, संगीता शिवशरण ,प्रमिला आपटे या उपाशीका उपस्थित होत्या तसेच निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन जिल्हाध्यक्ष कम लाकर कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.



देशभरातील दलितांच्या राजकीय चळवळीचे आरपीआय हेच मातृस्थान — केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली आरपीआय हीच आमची माय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/हैद्राबाद : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतुन स्थापन झालेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष देशभरातील दलितांच्या राजकीय चळवळीचे मातृस्थान आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली आर. पी. आय. हीच आमची माय आहे.त्यामुळे शरिरात रक्ताचा शेवटचा थेंब असे पर्यंत आम्ही देशभरात रिपब्लिकन पक्ष मजबूत करीत राहू असा निर्धार रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना .रामदास आठवले यांनी केला.

हैद्राबाद तेथे फायनांस सिटी येथे रिपब्लिकन पक्षाच्या खिश्चन मायनॉरिटी आघाडी च्या वतीने आयोजित जाहिर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील; संविधानातील समतावादी भारत साकारण्याचा संकल्प करणारी जाहिर सभा रिपब्लिकन पक्षाच्या खिश्चन आघाडी तर्फे आयोजित करण्यात आली होती.त्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ना.रामदास आठवले बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे आयोजक खिश्चिन आघाडीचे प्रमुख जॉन मसकु उपस्थित होते.

जॉन मसकु यांनी या कार्पामांचे अत्यंत शानदार आयोजन केले होते.यावेळी शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी निळे टी शर्ट आणि संपूर्ण हैद्राबाद मध्ये निळे झेंडे; स्व-ागताचे बॅनर लावून हैद्राबाद शहर आणि येथील फायन्साशल सिटी निळ्या झेड्यांनी निळी-निळी झाली होती.

हैद्राबाद शहर रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी रिपब्लिकनमय करुन टाकले होते.याबद्दल ना.रामदास आठवले यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी विचार मंचावर जॉन म सकु,परमशिवा नागेश्वरराव गौंड,ब्रम्हाम ानंद रेड्डी,कोमपल्ली प्रभुदास




तेलंगणाचे अध्यक्ष रवि पसुल ा,गोरखसिंग,रत्नप्रसाद,स्नेहलता, रोजाराणी,पुष्पा गंगा; लता आदि रिपब्लीकन नेते विचारमंचावर उप-स्थित होते.यावेळी विविध समाजा-तील लोकांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.मोठ्या संख्येने रिपब्लिकन कार्यकर्ते उपस्थित होते.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हे परिपूर्ण आणि जागतील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात संसदीय लोकशाही मजबुतीने उभी केली आहे.जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही भारत देशात नांदत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अपार ज्ञानामुळे भारतात संसदीय लोकशाही यशस्वी झाली आहे असे प्रतिपादन यावेळी ना.रामदास आठवले यांनी केले.

रिपब्लिकम पक्ष महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निशाणी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतुन रिपब्लिकन पक्ष साकार झालेला आहे. रिपब्लिकन पक्ष देशाच्या कानाकोपऱ्यात आम्ही पो-होचवत आहोत.सर्व जाती धर्मियांना रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आम्ही जोडत आहोत.

रिपब्लिकन पक्षावर आम्ही आम च्या आई प्रमाणे प्रेम करित आहोत. या देशातील दलित अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडवण्यसाठी; या देशातील जनता रिपब्लिकन पक्षावर पूर्ण विश्वास टाकेल.एक दिवस रिपब्लिकन पक्षाची या देशावर सत्ता येईल . त्यादृष्टीने रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी काम करावे असा बुलंद विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

दैनिक
यश सिद्धि न्यूज


# माघी यात्रेसाठी पंढरपूर नगरपालिका प्रशासन सज्ज

## मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव; ठिकठिकाणी लोखंडी बॅरिकेटिंग, १३ ठिकाणी भाविकांच्या वाहनांची सोय



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर : माघी शुद्ध एकादशी ०८ फेब्रुवारी रोजी होणार असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात. यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.

पंढरपूर नगर परिषदेच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरामध्ये येणा-या लाखो भाविकांना दर्शनासाठी जा-ताना किंवा मंदिर परिसर महाद्वार घाट व प्रदक्षिणा मार्गावर दिंडी घेऊन जात असताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून नगर परिषदेने अर्बन बँक ते नाथ चौक, स्वा.सावरकर पु-तळा ते महाद्वार, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट व इतर रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेऊन पोलीस प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्याचे काम चालु केले आहे. तसेच शहरामध्ये येणारी वाहने मुख्य रस्त्यावर किंवा प्रदक्षिणा मार्गावर येवुन भाविकांना चालताना अडथळा अथवा त्रास होवु नये म्हणुन सर्व ठिकाणी लोखंडी बॅरिकेटिंग करण्यात येत आहेत. तसेच यात्रेच्या निमित्ताने पंढरपूर शहरामध्ये भाविकांच्या मोठ्या प्रमाणात येणा-या वाहनांची सोय व्हावी म्हणुन १३ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच वाळवंटात येणा-या यात्रेकरुंना चालण्यासाठी व पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहने जाणे-येणेसाठी जुना पुल ते पुंडलिक मंदीरापर्यंतरस्त्याची आखणी करण्यात आली आहे. तसेच पुंडलिक मंदीर ते दगडी पुलापर्यंत ९ हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर असलेल्या लोखंडी पोलवर २०० वॅट एलईडी दिवे लावण्यात आले असुन यात्रा कालावधीत कायमस्वरूपी लखुबाई मंदिर घाट, उद्धव घाट, कुंभार घाट व चंद्रभागा घाट चार ठिकाणी स्टेडियम वर जसे फ्लड लाईट लावले जातात तसे फ्लड लाईटचे मोठे दिवे बसविण्यात आले आहेत सदर दिव्यांचा प्रकाश संपुर्ण वाळवंटात पडत आहे. त्याचप्रमाणे यात्रेकरुंच्या सोईसाठी संपुर्ण दर्शन बारी मार्ग, ६५ एकर मध्ये १६० एलईडी दिवे व ६ हायमास्ट बसविण्यात आले आहेत. तसेच ६५ एकर भक्ती सागर मध्ये असलेल्या १२ युनिटमध्ये असलेल्या १४०० शौचालयामध्ये विजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईन द्वारे यात्रेकरुंना पिण्याचे पाणी मिळावे या हेतुन नदीच्या वाळवंटामध्ये ७४ नळ बसविण्यात आले आहेत तसेच भक्ती सागर येथेही पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच वाळवंटात, ६५ एकर व पत्राशेड दर्शनबारी येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रेपूर्वी संपुर्ण वाळवंट व सर्व घाट स्वच्छ करणेत आले असुन दररोजच्या दररोज नदीपात्र स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने १०० सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच नदी पात्र, पत्राशेड दर्शनबारी, ६५ एकर, मंदिर परिसरात व शहरात आगीची दुर्घटना होवु नये म्हणुन महत्वाच्या ठिकाणी २४ तास अग्निशमन वाहने उभी करण्यात आली आहेत. पत्रा शेड, नविन अग्निशमन केंद्र, चंद्रभागा नदी वाळवंट,६५ एकर. श्री संत तुकाराम भवन येथे अग्निशमन यंत्रणा उभी करण्यात आली आहे तसेच मंदीरा भोवती आग लागल्यास अग्निशमन वाहनास त्वरीत पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन मंदीराच्या दक्षिण बाजुस फायर हायड्रेट उभा केला आहे. भाविकांसाठी यात्रा कालावधीमध्ये मंदीर परिसरात दोन वेळा पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेडमध्ये पिण्याचे पाणी नळ कनेक्शन द्वारे उपलब्ध करुन दिले आहे. या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात एकुण ६५ हातपंप व मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारे यात्रेकरुंना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच यात्रा कालावधीत पिण्याचे पाणी किमान १० टँकर द्वारे संपुर्ण शहरात विशेषतः भक्ती सागर वाळवंट पालखी तळ पत्राशेड ज्या ठिकाणी मठांची संख्या जास्त आहे त्याठिकाणी पाणी पुरविण्यात येणार आहे.

**बायोकल्चर तंत्राचा वापर करुन जैविक पद्धतीचे बायोकल्चर नदीच्या पात्रात होणारी घाण दुर्गंधीयुक्त वास कचरा व घाण नष्ट करणेचे दृष्टीने फवारणी करण्यात येत आहे. शौचालय नियोजनामध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत व सुलभ शौचालयाची २९ ठिकाणीं २०५४ सीट्स, नगरपरिषदेची कायमची २५ ठिकाणी १७६ सीट्स, ६५ एकर परिसरातील कायम स्वरुपी १२ ठिकाणी १८६४ सीट्स, प्री फॅब्रिकेटेड (नदी वाळवंट, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी, शहरात विविध ठिकाणी) असे एकुण १४ ठिकाणी ४००सीट्स असे शौचालयाचे नियोजन करण्यात आले आहे.तसेच नदीपात्राचे कडेवर महिलांना अंघोळी नंतर कपडे बदलणे करिता चेंजींग रूमची व्यवस्था करणेत आली आहे. तसेच यात्रा कालावधीत मोकाट जनावरे पकडुन त्यांना नगरपरिषदेच्या कोंडवाड्यामध्ये कोंडण्यात येत आहेत.**

यात्रा कालावधीत पुर्वी शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रा कालावधीमध्ये शहरात स्वच्छता रहावी म्हणुन नियोजन बद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. नगरपरिषदेच्यावतीने ७०० सफाई कर्मचा-यांद्वारे शहरात व उपनगरात स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहर, वाळवंट, ६५ एकर, पत्रा शेड दर्शनबारी येथे दररोजच्या दररोज स्वच्छता करण्यात येणार आहे. प्रत्येक मोठ्या मठांमध्ये स्वतंत्ररित्या कचरा साठविण्यासाठी लेखी पत्राद्वारे सुचना देण्यात आलेल्या असुन कोणत्याही परिस्थितीत कचरा बाहेर टाकु नये सर्व कचरा घंटागाडी कडे द्यावा म्हणुन कळविण्यात आले आहे. तसेच ४१ घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम यात्रा कालावधीत अहोरात्र चालु राहणार आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील ४ टिपर, २ कॉम्पॅक्टर, १ डंपरप्लेसर, ४ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने दररोज ५० ते ६० टन कचरा उचलण्याचे नियोजन केले आहे. नदीपात्र, ६५ एकर, पत्राशेड दर्शन बारी व शहरात गर्दीच्या ठिकाणी ५०० पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारण्यात आली आहेत. तसेच नागरी हिवताप विभागामार्फत शहरामध्ये डेंगु अथवा इतर आजाराचा प्रादुर्भाव होवु नये म्हणुन विशेष मोहिम हाती घेतली असुन कंटेनर सर्व्हे, औषध फवारणी व फॉगिंग मशीन द्वारे धुर फवारणी करण्यात येत आहे.

शहरात यात्रा कालावधीमध्ये पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने, उपजिल्हा रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने ,पत्राशेड, दर्शनबारी , पोलीस संकुल, दर्शन मंडप, ६५ एकर , चंद्रभागा वाळवंटात वेदांत भक्त निवास, नागरी आरोग्य केंद्र काळा मारुती व सारडा भवन, श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यात्रेकरुंच्या सोईसाठी प्रथमोपचार केंद्र उघडण्यात आले आहेत. तसेच यात्रा कालाधीमध्ये संपुर्ण यात्रे-वर नियंत्रण ठेवण्यासाठी , ६५ एकर भक्ती सागर, नदी वाळवंट, गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेड, पंढरपूर नगरपरिषद मुख्य कार्यालय या ठिकाणी आपातकालिन व्यवस्थापन केंद्राची (एजउ) स्थापना केलेली आहे.

यात्रा व्यवस्थित पार पडावी म्हणुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी अँड. सुनिल वाळुजकर, प्रशासकीय अधिकारी रवींद्र सूर्यवंशी, नगरअभियंता नेताजी पवार,उप अभियंता प्रकाश केसकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे व नागनाथ तोडकर, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे, सुहास झिंगे, सोमेश धट, ऋषिकेश गड्डम, कर अधिकारी सुप्रिया शिंदे, जनसंपर्क अधिकारी सुवर्णा हाके, मुख्य लेखापाल करुणा शेळके, अंतर्गत लेखापरीक्षक प्रशांत पवार, खरेदी पर्यवेक्षक विजय शहाणे,रोडलाईट इन्स्पेक्टर संतोष क्षिरसागर, आरोग्य निरीक्षक नाना गोरे, अग्निशमन अधिकारी संभाजी कार्ले, हिव-ताप अधिकारी शुभांगी अधटराव, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी प्रयत्नशील आहेत. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहरातील सर्व स्थानिक नागरीकांनी स्वच्छता व आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांनी केले आहे.

तसेच पंढरपूर शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने केलेल्या विविध कामाची पाहणी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पो-लीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड. सुनील वाळूजकर व प्रमुख अधिकारी यांच्या समवेत पाहणी केली.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचा ‘अविष्कार-२०२४’ मध्ये यशस्वी सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीने पुन्हा एकदा संशोधन आणि नव-ोपक्रमाच्या क्षेत्रात यशाची नवी उदाहरणे सादर केली आहेत.

विद्यापीठ स्तरीय अविष्कार स्पर्धेत स्वेरीच्या एका प्रकल्पाची निवड राज्यस्तरीय 'अविष्कार २०२४' साठी झाली आहे. या यशाबद्दल स्वेरीतील संशोधकांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. 'स्वेरी' हे संशोधन आणि नव-ोपक्रमशील संस्कृतीचे प्रतीक आहे, हे आता सर्वश्रुत झाले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्या-पीठ, सोलापूर अंतर्गत विद्यापीठ स्तरीय 'अविष्कार २०२४' ही संशोधन स्पर्धा सोलापूर मधील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित केली होती. या स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३०हून अधिक महाविद्यालयातील ४१४ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे संयोजन डॉ. रश्मी दीक्षित आणि डॉ. सतीश काशीद यांनी केले होते. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ प्रदान करणारी ठरली. यामध्ये स्वेरीच्या एका प्रकल्पाने उल्लेखनीय कामगिरी केली. स्वेरी फार्मसी विभागात बी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या अर्चना वसंत कोंगारी यांनी 'मेडिसिन आणि फार्मसी' गटात दुसरा क्रमांक मिळवला. त्यांना फार्मसीचे 'अविष्कार २०२४' चे समन्वयक डॉ. व्ही. व्ही. मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. दामा म्हणाले की, 'अविष्कार मध्ये विजेतेपद मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तयारी करावी आणि त्यात देखील यश खेचून आणावे असे सांगून उपयुक्त मार्गदर्शन केले. सन २००६ साली महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस एम. कृष्णा यांच्या पुढाकाराने विद्यापीठस्तरीय ‘अविष्कार’ ही संशोधनात्मक स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना चालना देणे, त्यांच्यामधील संशोधनवृती जोपासणे, नाविन्यपूर्ण विचारासाठी प्रोत्साहित करणे आणि संशोधनाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवणे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची ठरली आहे. विद्यापीठ स्तरा-वरील या स्पर्धेत प्युअर सायन्सेस, कृषी, ह्युमॅनिटीज, इंजिनिअरिंग, फार्मसी अशा विविध श्रेणींमध्ये युजी, पीजी आणि पीपीजी स्तरावरील विद्या-र्थी सहभागी झाले होते. स्वेरीच्या फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनाचा गौरव सर्व स्तरातून करण्यात येत आहे. विदयार्थ्यांनी अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मिळविलेले यश महाविद्यालयातील सशोधन आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे परिमाण आहे तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेचा आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे, हे मात्र निश्चित. यशस्वी संशोधक विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी अर्चना कोंगारी यांचे अभिनदन केले.

# शिक्षण महर्षी बाळासाहेब वाघ यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित, के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय काकासाहेबनगर महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने शिक्षण महर्षी भाऊ तथा बाळासाहेब देवराम वाघ यांची तृतीय पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अरुण ठोके उपस्थित होते. यावेळी डॉ ठोके यांनी आपल्या मनोगतात भाऊ तथा बाळासाहेब दे-वराम वाघ यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क, संचालक अजिंक्य वाघ होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भाऊंच्या त्यागी वृत्तीचे आणि त्यांनी केलेल्या समाजकार्याचे यथोचित वर्णन केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी केले.तर सूत्रसंचालन प्रा. भारती कुशारे, आभार प्रा. प्रतिक पाटील यांनी मानले. याप्रसंगी म हाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामनाथ पानगव्हाणे, . डी. एम. शिंदे, प्रा. किरण वाघ, डॉ. त्र्यंबक बाबळे, प्रा. मिलिंद पवार, प्रा. शीतल जगताप, प्रा. वैशाली शिंदे, प्रा. मुक्ता मोरे, डॉ. प्रतिभा बाहेकर, प्रा. बी. बी. कोल्हे, प्रा. निलेश आहेर, प्रा. अंकिता पवार, प्रा. . संजय आहिरे, . ज्ञानेश्वर गवळी, . अनिल राजोळे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# समाज बांधवांकडून सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला दहा लाख रुपयांचे सहाय्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुर्तीजापुर : सामाजिक न्यायासाठी आणि संविधानाच्या संरक्षणासाठी न्यायाची संविधानीक लढाई लढणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांची पोलीस कोठडीत हत्या करण्यात आली. समाजातील जागृत लोक एकत्र येऊन शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक, सामाजिक व वैचारिक सहकार्य करण्यासाठी समोर येत आ-हेत. सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. परंतु मुलाप्रमाणे स्वाभिमानी असलेल्या आईने शासनाची दहा लाखाची मदत नाकारून न्यायाची मागणी लावून धरली. सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळण्यासाठी समाजातील अनेक घटक समोर येत आहेत. तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहकार्य करण्यासाठी संपूर्ण समाज एकवटला आहे तर एकीची ताकद दाखवून दिली. समाजा-तील वैचारिक लोक एकत्र आले तर सरकार पेक्षा मोठे काम करून दाखवू शकतात या माध्यमातून दिसून आले. समाजातील अनेक सामाजिक संस्था सामाजिक बांधव यांनी आपापल्या परीने होईल ती मदत करून सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार देऊन आपली नैतिक जबाबदारी पार पाडली. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मुर्तीजापुर यांच्या माध्यमातून समाज बांधवांनी सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाला दहा लाख रुपये तर पँथर विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयाची आर्थिक मदत करण्यात आली. कोणतेही काम एकीने केले तर त्याचा प्रभाव खूप मोठा होतो हे यामधून दिसून आले आहे राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व त्यांच्यासोबत ज्या सामाजिक बांधवांनी सहकार्य केले ते सर्व कौतुकास पात्र असून नैतिक इमानदार लोक आहेत. हे आर्थिक साह्य केल्याने आंबेडकरवादी चळवळीमध्ये ऊर्जा तर सरकारवर दबाव निर्माण होतो. आणि भविष्यामध्ये अशा प्रकारचे नुकसान टाळता येऊ शकते. म्हणून कोणतेही काम एकीने करणे आवश्यक आहे ही मदत करताना आयु. सचिन गावंडे सर, आयु, सुमेद घनबहादुर, आयु पांडुरंग तारू सर, अँड गोपणारायन सर, लायसे सर आणि जाधव सर हे लोक उपस्थित होते.

**श्री गणेश मूर्ती व कलशाची भव्य मिरवणुकीद्वारे नगर प्रदक्षिणा**

**स्वामी हरी चैतन्यानंद यांच्या हस्ते ७ फेब्रुवारी रोजी गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा..!**

# इसरूळ येथे गणेश जयंती निमित्त हरीनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : इसरुळ तालुका चिखली जि. बुलडाणा येथील भक्ताच्या नवसाला पावणारा गणपती म्हणून श्री सिध्दिविनायक गणपती ची पंचक्रोशी मध्ये ओळख आहे. या मंदिराचे बांधकाम गावकर्यांच्या व भक्तानीं दिलेल्या लोकवर्गणी सारख्या निधीतून व त्यांच्या सहकार्यातून पूर्ण झाले आहे. त्या मंदिरामध्ये गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन करण्यासाठी गणेश जयंती च्या निमित्त हरीनाम सप्ताह चे आयोजन केले आहे. शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५स्वामी हरी चैतन्यानंद यांच्या हस्ते या मंदिराचे कलशरोहन व मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे.

नवीन मंदिरामध्ये गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याच्या निमित्ताने हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे त्यांचा प्रारंभ : मा.शु. २ शुक्रवार, दि. ३१/१/२०२५ झाला असून त्याची सांगता : मा.शु. १० शुक्रवार, दि. ७/२/२०२५ रोजी होणार आहे.

यामध्ये सकाळी ४ ते ६ काकडा आरती, दुपारी २ ते ५ रामकथा, ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल. यामध्ये संगीत रामकथा प्रवक्ते ह. भ. प. रामायणचार्य रामेश्वर महाराज भालेराव ( आळंदी देवाची ) तर त्यांना सहकार्य मृदूंगाचार्य - उमेश महाराज सरोदे,

गायनचार्य - समाधान महार-ाज जोगदंड, पांडुरंग महाराज घारे, सिंथवादक -वायाळ महाराज यांचे लाभले आहे.

दिनांक ३१/१/२०२५ ला श्री.ह.भ.प. शंकर महाराज भोपळे (सिपोरा अंभोरा) १/२/२०२५ शनिवार ला श्री.ह.भ.प. संजयजी पाटनकर महाराज (इसरुळ) २/२/२०२५ श्री.ह.भ.प. विकास महाराज बनसोडे (अहमदनगर) यांचे तर ३/२/२०२५ ला श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज झगरे गुरुजी (वाकडकर) (महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त) यांचे कीर्तन झाले.

४/२/२०२५ मंगळवार ला श्री.ह.भ.प. मोहन महाराज (सिद्धांत आश्रम वरखंड) ५/२/२०२५ बुधवार ह.भ.प. शुभम महाराज चिं-चोले (मालगणी) ६/२/२०२५ गुरुवार श्री.ह.भ.प. सुनिल महाराज शिंगणे (दे. मही) ७/२/२०२५ शुक्रवार ला ब्र.श्री. हरिदास महार-ाज (श्री गुरुदेव आश्रम, पळसखेड सपकाळ) यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद होणार आहे.

दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य मिरवणुकीच्या माध्यमातून अतिशय आनंदमय वातावरणात मुर्ती व कलशाची नगर प्रदक्षिणा पार पडली त्यावेळी सर्व गावकरी श्री गणेशाच्या भक्तीसागरात बुडाले. अतिशय नियोजन बद्ध, या मिरवणुकीत भक्तीरथ फुलांच्या माळांनी सजवून त्या रथामध्ये गणेशाची मूर्ती व कलश ठेवीले होते. बाप्पाच्या मूर्तीचे रूप अतिशय आकर्षक व सुंदर दिसत होते. यामध्ये अनेक महिला भजनी मंडळ सहभागी झाले.त्यांनी एकाच रंगाचा पोशाख धारण केला होता. दिंडीमध्ये सहभागी महिलांनी फुगडी खेळत भक्तिमय वातावरणात आनंद लुटला.

दि. ६ फेब्रुवारी २०२५ होम व पुजन आणि दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वा. व कलशारोहण,गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा नंतर काल्याचे किर्तन होणार आहे. तरी परिसरातील भक्त मंडळींनी या सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे सिद्धिविनायक गणेश मंदिर समितीच्या वतीने आवाहन केले आहे.